# पेठकर मोटर्सच्या शोरूमचे उद्घाटन

**पुणे : प्रतिनिधी**

हिंदुस्थान मोटर्स मित्सुबिशीचे पुण्यातील दुसरे शोरूम 'पेठकर मोटर्स'ने सुरू केले असून, नुकतेच याचे उद्घाटन हिंदुस्थान मोटर्सचे मार्केटिंग प्रमुख योशियाकी वाडा यांच्या हस्ते झाले.

यावेळी कंपनीचे विक्री प्रमुख आशीष कौल, पेठकर मोटर्सचे व्यवस्थापकीय संचालक सचिन पेठकर आदी मान्यवर उपस्थित होते. सेनापती बापट मार्गावरील आयसीसी टॉवरमध्ये ही अत्याधुनिक सेवासुविधांनी सुसज्ज, आलिशान शोरूम सुरू केली असून, येथे मित्सुबिशीच्या केडिया, आऊट लँडर, लान्सर इव्होल्युशन एक्स, पजेरो, मोटेरो या सर्व गाड्या उपलब्ध आहेत. ३८०० चौरस फुटांच्या या शोरूममध्ये एकावेळी ४ गाड्या ठेवता येतात. योशियाकी वाडा म्हणाले की, भारतात आमचे अस्तित्व दाखवून देण्यासाठी पुणे ही महत्त्वाची बाजारपेठ आहे. आमची सर्वोत्कृष्ट उत्पादने व सेवा ग्राहकांना येथे उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या शोरूममध्ये प्रशिक्षित कर्मचारी वर्ग, दर्जेदार सुटे भाग, उपकरणे उपलब्ध आहेत. क्रॅश रिपेअर सिस्टिमसारखी आधुनिक यंत्रणाही येथे लवकरच उपलब्ध होईल, असे पेठकर मोटर्सचे व्यवस्थापकीय संचालक सचिन पेठकर यांनी यावेळी सांगितले. ताथवडे येथे विक्री, दुरुस्ती आणि सुटे भाग मिळण्याचे भव्य शोरूम असून, दिवसाला २०-२५ वाहनांची तेथे देखभाल होऊ शकते. हिंजेवाडी, चाकण, पिंपरी, लोणावळा, तळेगाव, नगर, नाशिक रोड या ठिकाणी पेठकर मोटर्सतर्फे सेवा दिली जाते.

## प्रत्येक गाडीसाठी एक झाड लावणार

पर्यावरण संवर्धनासाठी एक अभिनव उपक्रम पेठकर यांनी हाती घेतला आहे. त्यांच्या शोरूममधून विकल्या जाणाऱ्या प्रत्येक गाडीच्या क्रमांकाचे एक झाड लावण्यात येणार आहे. सामाजिक संस्थेच्या जागेवर हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.



**पेठकर मोटर्स शोरूम उद्घाटनाप्रसंगी सचिन पेठकर आणि हिंदुस्थान मोटर्स विक्री प्रमुख आशिष कौल.**